# हळबे महाविद्यालयाचे दोडामार्गात स्वच्छता अभियान

## २ ऑक्टोबरपासून सुरुवात

▶ दोडामार्ग *(प्रतिनिधी)*

दोडामार्ग येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई हळबे महाविदयालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दोडामार्ग शहरात स्वच्छता अभियान राबवण्यात येणास असून त्याचा प्रारंभ २ ऑक्टोबर पासून करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायत दोडामार्ग व लक्ष्मीबाई हळबे महाविदयालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन अध्ययन विभाग यांच्या संयुक्त विदयमाने दोडामार्ग शहरातील प्रमुख रस्त्याची स्वच्छता व प्लॅस्टिक निर्मूलन मोहीम २ऑक्टोबर रोजी राबवण्यात येणार आहे. सकाळी ९.०० वाजता कसई दोडामार्ग ग्रा. पं. सरपंच नानचे यांच्या हस्ते पिंपळेश्वर चौकात म. गांधीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर सुरूवात होणार आहे. त्यानंतर स्वच्छता प्रसारार्थ चौकातच एनएसएसचे विदयार्थी पथनाटय सादर करणार आहेत. त्यानंतर भेडशी रोड, सावंतवाडी रोड, आई रोड, व गोवा रोड, या चार प्रमुख रस्त्यावरील कचरा, प्लास्टिक गोळा करून तसेच रान काढून रस्ते लख्ख करण्यात येणार आहेत. यासाठी कसई दोडामार्ग ग्रामपंचायतीने सर्व मदत देऊ केली आहे. ग्रामपंचायतीच्या सहकार्यातून २०१९ पर्यंत स्वच्छता मोहीम राबवणार आहे. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची संकल्पना व मार्गदर्शनानुसार या मोहिमेला व्यापक स्वरूप यावे, दोडामार्ग स्वच्छ व सुंदर शहर बनावे यासाठी शहरातील सर्व समाजसेवी संस्था व शासकीय कार्यालयांनीही या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन रा. से. यो. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. यू. दरेकर व प्रा. आर. ए. मोरे यांनी केले आहे.